# केवळप्रयोगी अव्यय

**केवलप्रयोगी अव्यय :-** आपल्या मनातील अचानक निर्माण होणाऱ्या भावना ज्या शब्दाने व्यक्त करतात, त्याला केवळप्रयोगी अव्यय / उद्‌गाराथ्री अव्यय असे म्हणतात.

उदा. १) **अबब!** केवढ मोठा साप.

२) **अरेरे!** खूप वाईट झाले.

३) **शाब्बास!** मला तुझ्याकडून हेच पाहिजे.

वरील वाक्यात अबब, अरेरे, शाब्बास हे शब्द आपल्या मनातील अचानक निर्माण होणाऱ्या भावना निर्माण करतात, म्हणून ती केवळप्रयोगी अव्यय आहेत.

केवळप्रयोगी अव्ययांचे वर्गीकरण त्याच्या स्वरुपावरून न करता त्यातील भावनावरून करतात.

केवळप्रयोगी अव्ययाचे प्रकार:

१) **तिरस्कारदर्शक :** धिक,हूड, फूस, हात, छत, छी, शी, थु, इश्श, हुडत.
२) **प्रशंसादर्शक :** यंव, ठीक, छान, फक्कड, खाशी, शाबास, भले, वाहवा.
३) **शोकदर्शक :** अगाई, आईग, हायहाय, हाय, ऊ, ऑ, अरेरे, अयाई, देवा रे.
४) **आश्चर्यदर्शक** : बापरे, अहाहा, चकचक, अरेच्चा, ऑ, ओहो, अबब, अय्या, अगंबाई.
५) **हर्षदर्शक** : ओहो, अहाहा, व, वावा, आ-हा.
६) **मौनदर्शक** : शु, चूप, चीप, गप, गुपचिप.
७) **संमतीदर्शक** : ब्राय, हां, अच्छा, हा, जी, जिहा, ठीक.
८) **संबोधनदर्शक** : अंग, अरे, अहो, ए, अगा, अगो, ब, रे.
९) **विरोधदर्शक** : छे, छट, ह्याट, उहू, च, अंहं, छे-छे, च-च, उं.

**व्यर्थ उद्‌गाराची अव्यये :** जी उद्‌गारवाची अव्यये कोणताही भाव व्यक्त करत नाही.तसेच त्यांच्या वापराने वाक्याच्या अर्थावर कोणताही परिणाम होत नाही किंवा वाक्याच्या अर्थाच्या दृष्टीने निरर्थक किंवा व्यर्थ असे हे शब्द येत असल्यामुळे अशा शब्दांना ‘व्यर्थ उद्‌गाराची अव्यये’ म्हणतात.

उदा : बेटे, आपला, म्हणे, बापडा.

उदा : १) मन खूप धाव घेते. पण शरीर **बेटे** साथ देत नाही.

२) मी **आपला** गप्पच उभा होतो.

३) काळ **म्हणे** खूप पाऊस पडला.

४) सगळे खेळत होते. रामू **बापडा** गप्प बसला होता.

**पादपूरनार्थक केवळप्रयोगी अव्यये (पालपुदे )** : बोलताना लकब म्हणून किंवा उगीचच पुन:पुन्हा आलेल्या शब्दांना पादपूरनार्थक केवळप्रयोगी अव्यये किंवा पालपुदे म्हणतात.

उदा : नाहीका, बरंका, आत्ता, जल्ला मेलं, कळल इतक, जेहेत्ते, बरिक.

उदा : १) गुरुजी मुलांना शिकवतात **बरंका**!

२) चोर पळून गेले काय उपयोग **आत्ता** जाऊन!

३) हल्ली माणसात माणुसकी उरलीज नाही **नाहीका!**